# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/04/2023 (मंगळवार) दुपार


## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा करंभाड शिवार येथे दिनांक १०/०४/२०२३ चे ०२/५० वा. ते ०३/३५ वा. दरम्यान यातील **आरोपी नामे– १) श्रीपंत शिवलाल इवनाती, वय ३६ वर्ष** याने **२) राजकुमार मारोतराव लोहकरे, वय ५२ वर्ष, रा. करंभाड ता. पारशिवनी** याचे सांगनेवरून आपले ताब्यातील विना नंबर चे ट्रॅक्टर व ट्रॉलीमध्ये दहेगाव जोशी शिवारातील कन्हान नदीचे पात्रातुन अवैध्यरित्या रेती उत्खनन करून एक ब्रास रेती ट्रॅक्टर व ट्रॉलीमध्ये भरून विनारवाना रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून एक लाल रंगाचा महिन्द्रा कंपनीचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर किंमती अंदाजे ४०००००/– रू. एक निळया रंगाची विना क्रमांकाची ट्रॉली किंमती अंदाजे १०००००/– रू व एक ब्रास रेती ४०००/–रू. किंमती अंदाजे असा एकुण ५०४०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा ब. नं. ४१८ मो. नं. ९८२३७२२४१८ हे करीत आहे.

## इलेक्ट्रीक मोटार चोरी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील भानेगाव शिवार येथे दिनांक १०/०४/२०२३ चे ०२/०० वा. ते ०४/०० वा. सुमारास फिर्यादी नामे– महेश अट्टलसिंग भलावी, वय ५८ वर्ष, रा. वार्ड नंबर चार खापरखेडा हा रात्री ०२/०० वा. सुमारास रूममध्ये आराम करण्यासाठी गेला असता ०४/०० वाजता बाहेर आला तर विटभट्ट्यावर शेडमध्ये खुल्या जागेत ठेवलेली २० एचपी क्रॉम्प्टन कंपनीची इलेक्ट्रिक मोटार किंमती अंदाजे २५,०००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास स.फौ पवार ब.न ११९ खापरखेडा मो. नं. ८०८००८८५२८ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा बीटोली शिवार येथे दिनांक ०९/०४/२०२३ चे १९/०० वा. ते दिनांक १०/४/२०२३ चे ०६/३० वा. सुमारास फिर्यादी नामे— देवमन सावाजी दोडके, वय ६१ वर्षे, रा. बिटोली ता. पारशिवनी व इतर दोन इसम यांच्या शेताजवळील पाण्याचे कॅनलवर लागलेले ०३ जुनी ५ एचपी किर्लोस्कर कंपनीची ऑईल इंजिन एकुण किंमती २००००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार मो. नं ७३५००७१९४१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**